समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड (महाराष्ट्र)

International Research Journal ISSN-0975-3486 RNI : RAJBIL 01488 VOL. I * ISSUE—1

शोध पत्र—समाजशास्त्र

SEPT—2009

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य व कर्तृत्त्व : एक समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा. कु. महानंदा राऊतखेडकर

समाजशास्त्र विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड ( महाराष्ट्र )

**प्रस्तावना :**

सावित्रीबाईंच्या कालखंडात स्त्रीयांनतर अनेक सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक निर्बंध होते. त्याचप्रमाणे शिक्षणावरदेखील बंदी होती. स्त्री शिकली की, अक्षर वाचली व काढली की, धर्म बुडेल, महाप्रलय होईल, त्यांना अकाली वैधव्य येईल, अक्षरांच्या आळ्या तयार होऊन घरातील पुरूषांच्या जेवणाच्या ताटात पडतील असे अनेक गैरसमज समाजात रूढ होते. अशा प्रतिकुल परिस्थितीत सावित्रीबाई फुले यांनी शैक्षणिक कार्य म्हणजे शाळेत अध्यापनाचे, ज्ञानदानाचे कार्य केले.

**कार्यक्षेत्र व संशोधन पद्धती** -प्रस्तुत संशोधन निबंधासाठी कोणत्याही गावाची, शहराची मर्यादा न ठेवता उपलब्ध झालेल्या दुय्यम तथ्य सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

**उद्देश** : -१) सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचे अध्ययन करणे. २) सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्यामुळे स्त्रीशूद्रातीशूद्रांचे अज्ञान दुर होऊन त्यांना ज्ञानप्राप्ती झाली यांचा अभ्यास करणे.

**संशोधन आराखडा**-प्रस्तुत संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**व्याप्ती व मर्यादा** -सावित्रीबाई फुले यांच्या साहित्यातून व कार्यातून तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक असे अनेक पैलू स्पष्ट होतात. पण या संशोधन निबंधात त्यांच्या शैक्षणिक कार्याचेच अध्ययन केले आहे. सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य व कर्तृत्त्व पुढीलप्रमाणे विशद करता येईल.

**शाळांची स्थापना**-म.जोतीराव फुले यांनी ९ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात भिडेवाड्यात बहुजन समाजातील शुद्रातीशुद्र मुलींसाठी पहिली शाळा काढली. पुण्यात महारवाड्यात दुसरी शाळाही लगेच सुरू केली. या दोन्ही शाळात अध्यापनाचे कार्य सावित्रीबाई फुले याच करत होत्या. या शाळेतील मुलींच्या पहिल्या शाळेच्या पटावरील नावे व वय पुढीलप्रमाणे होते - "१) अन्नपूर्णा जोशी, वय ५ वर्षे, २) सुमती मोकाशी, वय ४ वर्षे ३) दुर्गा देशमुख, वय ६ वर्षे ४) माधवी थत्ते, वय ६ वर्षे ५) सोनू पवार, वय ४ वर्षे ६) ज्योती करडिले, वय ५ वर्षे या मुलींपैकी ४ ब्राह्मण, १ मराठा, १ धनगर अशा मुली होत्या. शाळेला मुली पाठवण्याकरीता स्वत: सावित्रीबाई व जोतीबा पालकांच्या घरी जाऊन त्यांची मनधरणी व मनाची तयारी करत त्यामळे साहजिकच दिवसेंदिवस मुलींची संख्या वाढू लागली"[१] पुण्यात अशा शैक्षणिक कार्यामुळे प्रस्थापित ब्राह्मण, पुरोहित, सावित्रीबाई व जोतीराव फुले यांना विरोध करू लागले. घरोघरी जाऊन स्त्री शिक्षणाचं महत्त्व पटवावं लागे. शिपायांकडून मुलींना आणावे लागे. मुलींना कपडे, फळे व खेळण्याची साधने द्यावे लागत[२]

**सामाजिक विरोध पत्करून शैक्षणिक कार्य पार पाडले** -सावित्रीबाई फुले यांनी जेंव्हा शैक्षणिक कार्य केले तेंव्हा स्त्रियांना सामाजिक जीवनात प्रवेश नाकारला जात होता. स्त्रियांचे कार्यक्षेत्र म्हणजे 'चुल आणि मुल' व घरांच्या चार भिंतीच्या आतच होते. 'साध्वी सावित्रीबाई फुले यांचे इत्यंभूत चरित्र' या ग्रंथात लेखिका फुलवंताबाई झोंडगे लिहितात, "जोतिबालाच काय पण सावित्रीला देखील नावे ठेवीत होते. ही बाई धर्म बुडवी, धर्मद्रोही, बाटगी, कैदाशीण आहे". सावित्रीबाई शाळेत जाऊ लागल्या की रस्त्यात टगे लोक टोळी-टोळीने जमू लागले आणि कुत्सितपणे कुजबुजून शिव्या मारीत! एकमेकांकडे पाहून अर्वाच्य बोलत. शिव्यादेखील देत. त्यांचा त्रास देण्याचा सावित्रीबाईस संताप येई पण तो ती मोठ्या प्रयत्नाने गिळून टाकी. जसे कामाने काम करता

येते, तसे प्रयत्नाने शहाणपण येत असते"[३] यावर सावित्रीबाई अत्यंत शांत चित्तांनी त्यांना निरूत्तरीत करणारे उत्तरे देत, "मी माळीण आहे समजलं? माळ रानावर सुंदर झाडे लावून त्याचे नंदनवन करणे हा जसा माझा धर्म आहे. तसाच रेताड झालेल्या समाजात ज्ञानवृक्ष लावणे माझा मानवप्रणित धर्म आहे"[४] सावित्रीबाई शाळेत शिकविण्यासाठी जात तेंव्हा सनातनी, मनुवादी पुरूषमंडळी शेण, माती व चिखल टाकत तेंव्हा अंगावर व पिशवीत एक साडी घेऊन त्या शाळेत जात. शाळेत शिकवण्याच्या आगोदर साडी बदलून स्वच्छ साडी, स्वच्छ ज्ञान देत व लोकांना म्हणत, "माझ्या लहान थोर बंधूनो मी आपल्या धाकटया भगिनींना शिकविण्याचे पवित्र कार्य करीत आहे, मला उत्तेजन देण्यासाठी आपण माझ्यावर हे शेण, अगर हे खडे फेकीत नसून ही फुले उधळीत आहात, तुमचे हे कृत्य मला असे शिकविते की, मी नेहमी अशीच आपल्या भगिनींची सेवा करीत रहावे, ईश्वर तुम्हांला सुखी ठेवो"[५]

**१८४८ नंतर विविध शाळांची स्थापना**-तत्कालीन समाजात मोठ्या प्रमाणात अज्ञान, जातीभेद, भाषाभेद इत्यादी इनेक समस्या होत्या. त्यांना दूर करण्यासाठी एक शाळा पुरेशी नव्हती म्हणून म.फुले यांनी पुणे व पुणे परिसरात पुढीलप्रमाणे आपल्या शाळा उघडल्या. "यासाठी त्यांनी संस्था (मंडळ) स्थापन केले. जोतिराव-सावित्रीबाईंनी 'नेटीव्ह फिमेल स्कूल पुणे' व 'दि सोसायटी फॉर प्रमोटिंग दि एज्युकेशन ऑफ महारस् मांग्ड अँड एट्सेट्राज' अशा दोन शिक्षण संस्था सुरू केल्या. या संस्थेमार्फत पुणे परिसरात शाळांचे जाळे विणले"[६]

**शिक्षक-शिक्षिका म्हणून व नॉर्मल स्कूलची स्थापना :** सावित्रीबाई व जोतीरावांनी अनेक शाळा काढल्या ते दोघे अध्यापनाचे काम रात्रं-दिवस करीतच होते. परंतु, शाळेचे व शिक्षणाचा विस्तार पाहता सर्वच शाळेवर जाऊन शिकवणे शक्य नव्हते त्यासाठी "जोतिबा व सावित्रीबाईंनी शिक्षिका तयार करण्यासाठी जे 'नॉर्मल स्कूल' काढले त्यामधून प्रशिक्षित झालेल्या पहिल्या विद्यार्थीनी व पहिल्या शिक्षिका म्हणजे फातिमा शेख होत. सावित्रीबाई व फातिमा या दोघी एका-एका मागासलेल्या समाजातील मुलींच्या शाळेवर तर ब्राह्मण शिक्षक ब्राह्मण श्रीमंताच्या मुलींच्या शाळेवर काम करत असत.[७] अध्यापन करणे एक शास्त्र व कला आहे. ती शिकविण्यासाठी जोतीबांनी-सावित्रीबाईंनी नॉर्मल स्कूलची स्थापना केली.

**मनोरंजक, आनंददायी अभ्यासक्रम :**"सावित्रीबाई अलौकिक प्रतिभेच्या धनी होत्या. शाळेत शिकवितांना उपयोगात पडतील अशा अनेक कविता त्यांच्या संग्रहात आहेत. ह्या कविता त्यांनी एक तर उत्स्फूर्तपणे अथवा संपूर्ण विचारांती विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या सहज शिक्षणासाठीच लिहिल्या असाव्यात. उदा - 'स्वागतपर पद्य', 'राणी छत्रपती ताराबाई', 'श्रेष्ठ धन', 'बाळास उपदेश', 'नवस', 'इंग्रजी शिका', 'शिकण्यासाठी जागे व्हा', 'बोलकी बाहुली' इत्यादी यातील काही कविता तर आजही बालकांच्या वर्गात गाऊन दाखविण्यासारख्या आहेत. यावरून सावित्रीबाई त्या काळातसुद्धा आनंददायी शिक्षण सदृश्य प्रकल्प राबवित असाव्यात असे वाटते. प्राथमिक शिक्षणावर खूप गांभीर्याने विचार होऊ लागलेला दिसतो. आनंददायी प्रकल्प नव्याने प्रस्थापित केला.[८] मनोरंजनातून, हसतखेळत प्राथमिक शिक्षण दिले तरच शिक्षणाची गोडी विद्यार्थ्यांत निर्माण होईल व बहुजनातील मुले शिकू शकतील हा विचार करूनच शाळेत शिकवत, शाळेत शिकवतांना, "सावित्रीबाई मुलींना शिकविण्यात आनंदून जात असाव्यात" असे दिसते. मी तर असे म्हणेल की, त्यात त्यांना मानसिक तृप्ती जाणवत असावी. त्यातून महत्त्वाचे म्हणजे अध्यापन पद्धतीतील नवनवीन प्रयोग सावित्रीबाई करीत असल्याचेही लक्षात येते. शिक्षणाविषयीचे मुलींचे व शूद्रांचे अथवा एकूणच बाह्मणतेत्तर समाजाचे नैराश्य घडविण्यासाठी हे आवश्यकच होते"[९]

**प्रौढ शिक्षण**-सावित्रीबाई फुले या प्रौढ शिक्षण व रात्रीची शाळा या विचारांच्या व प्रयोगांच्या आद्यजनक आहेत. त्यावरून त्यांची दूरदृष्टी आपणांस दिसते. "२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर प्रौढ शिक्षण व त्यासाठी रात्रीच्या शाळांची गरज याचे महत्त्व सरकार व बुद्धीवाद्यांना कितीही पटले तरी परंपरेच्या पगड्यामुळे प्रौढ शिक्षणाची आज प्रौढांकडून वाट लावली जाते. ह्या पार्श्वभूमीवर १९ व्या शतकात प्रौढ शिक्षणाची केवळ कल्पनाच न करता तन-मन-धनाने ती राबविणे, रात्रीची शाळा काढून तीमध्ये येण्यास घराघरात जाऊन (नाटकाद्वारे) लोकांना प्रवृत्त करणे हे कार्य सामान्यांचे निश्चितच नव्हते. त्यासाठी दुर्दम्य इच्छाशक्ती, प्रामाणिक व चिवट जिद्द, नि:स्वार्थी, निष्काम कर्मयोग्याचे व्यक्तिमत्त्व असावे लागते. सावित्रीबाई व जोतीबांच्या व्यक्तिमतत्वाचे मोठेपण यासाठीच मान्य करावे लागते"[१०] सारांश, सावित्रीबाई फुले त्यांच्या वरील शैक्षणिक कार्यामुळे बहुजन, शुद्रातीशूद्र स्त्रियांसाठी विद्येचे दैवत ठरल्या.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) युगपुरूष - महात्मा जोतीराव फुले - लेखक बा.ग.पवार, पृ.३०, ३१ २) सामाजिक क्रांतीची अग्रदुत; सावित्रीबाई फुले - लेखक प्रा.रघुनाथ कडवे, पृ.१८ ३) साप्ताहिक-राजकीय सत्तांतर, संपादक-प्राचार्य गजमल माळी, दिनांक १६ फेब्रुवारी २००२ चा अंक, पृ.२ ४) साप्ताहिक-राजकिय सत्तांतर, संपादक-प्राचार्य गजमल माळी, दिनांक १६ फेब्रुवारी, २००२ चा अंक, पृ.२ ५) युगपुरूष - महात्मा जोतीराव फुले - लेखक बा.ग.पवार, पृ.३२ ६) सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्त्व, संपादक हरी नरके, पृ.१६२ ७) महात्मा फुले गौरव ग्रंथ (खंड पहिला), संपादक हरी नरके, य.दि.फडके, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले काल व कर्तृत्त्व - डॉ.मा.गो.माळी, पृ.४३० ८) सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्त्व - संपादक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, लेखक -शिक्षणशास्त्रज्ञ सावित्रीबाई लेखक - प्रा.अनिल प्रांजळे, पृ.६७ ९) कित्ता १०) सावित्रीबाई फुले : काल आणि कर्तृत्त्व - संपादक महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ, मुंबई, लेख - शिक्षण शास्त्रज्ञ, सावित्रीबाई फुले, लेखक - अनिल प्रांजळे, पृ. ६८